एकता मासिक कॅलिफोर्निया विशेषांक १९८२

# महाराष्ट्र मंडळ लॉस अेन्जेलीस

## ‘बाल्यावस्थेपासुन शैशवापर्यंत’

- शरद दांडेकर

“छे! फारच गर्दी झाली बुवा!” असे उद्‌गार कोणी-तरी ११ वर्षापूर्वी एका घरगुती झालेल्या दिवाळीच्या कार्यक्रमास काढले. विश्वास ठेवा अगर ठेवू नका, परंतु ह्या उद्‌गारानंतर पुढील घटनांची सांखळी सुरू गेली आणि त्याचे रुपांतर १९७३ च्या संक्रांतीस लॉस एंजेलीसचे महाराष्ट्र मंडळ स्थापन होण्यांत झाले.

आपण मराठी माणुस सुकांतच स्नेह-प्रेमी. वरील उद्‌गार ऐकल्यावर नाबडतोब ह्या प्रेमाची प्रचिती आली. ‘१९७१ च्या दिवाळीचा कार्यक्रम आमच्याकडे करा, आमचे घर मोठे आहे’ असा प्रतिसाद डॉ. व सौ. आंबे ह्यांचेकडून मिळाला व त्यानुसार त्यावर्षी-ची दिवाळीही आणखीच जोरदार झाली. इतर काही छोटेमोठे समूह एकत्रित आले आणि मोठ्या घरात मोठ्या प्रमाणावर दिवाळी साजरी झाली. परंतु हे कर्णोपकर्णी व्हायला काय वेळ लागतो? (येथे महिला मंडळे नसली तरी दूरध्वनी आहेतच की नाही ---). पुढील वर्षी ‘मोठ्या’ घरातही गर्दी व्हा-यला लागली आणि मंडळाच्या स्थापनेला चालना मिळाली. कर्मधर्मसंयोगाने सुप्रसिद्ध विनोदी लेखक श्री. रमेश मंत्री त्याचसुमारास येथे आले होते. त्यांनी ह्या कल्पनेला नुसतेच उचलून धरले असे नाही तर सक्रीय पाठींबा देऊन १९७३ च्या संक्रांतीला श्री. अरुण फडणीस ह्यांचे अध्यक्षतेखाली मंडळ स्थापन झाले आणि मंडळाचे पहीले ‘भारतीय पाहुणे’ होण्याचा मान त्यांनी मिळवला.

१९७३ साली अशा तऱ्हेने मंडळ स्थापन झाल्या-वर त्याची घटना व० तयार होऊन मोठ्या उत्साहाने मंडळाच्या कार्यक्रमास सुरुवात झाली. कार्यक्रमाचे स्वरूप अर्थातच सांस्कृतिक असून येथील मराठी व महाराष्ट्रप्रेमी बांधवांना आपल्या संस्कृतीचे दर्शन सतत घडत आहे. मंडळाच्या पहील्या ६-७ वर्षांच्या कारकिर्दीत बऱ्याच तांत्रिक अडचणी येणे अगदी स्वाभाविकच होते. परंतु संघटनाचातुर्य ह्या गुणाचा पुरेपूर आविष्कार महाराष्ट्रीयन रक्तात अस-ल्याची प्रचीती ह्या काळात खासच आली. विविध प्रकारचे सांस्कृतिक कार्यक्रम सतत होत होते. मराठी रंगभूमीवरील गाजलेल्या ‘भावबंधन’, ‘तुझे आहे तुजपाशी’ ह्यातील नाट्य-प्रवेशांनी १९७३ च्या सप्टें-बरमध्ये येथील नाट्य-विभागास सुरुवात झाली. पुढे १९७५ सप्टेंबरला ‘सारं कसं शांत शांत’ ह्या एकांकिकेचाही प्रयोग झाला. त्यातून उत्साह प्राप्त होऊन ‘तुझे आहे तुजपाशी’ सारख्या संपूर्ण नाट-काचीही तयारी काही हौशी कलाकारांनी केली होती. परंतु अजूनपर्यंत मंडळाची संघटना इतकी मोठी उडी घेण्याइतकी बळकट नसल्याने १९७६ च्या सप्टेंबर-मध्ये पहिला अंक सादर करून समाधान मानावे लागले. संगीतात ह्या काळांत त्यामानाने खूपच प्रगती स्थानिक कलाकरांनी केली. मुख्य उद्देश येथील मराठी भाषिकांत संगीताची आवड निर्माण करणे व निर्माण झालेली कायम ठेवणे व वृध्दिंगत करणे. स्थानिक कलाकार खूपच हौशी होते व त्यांना प्रतिसादही चांगला मिळाला. संगीतातील गुणवैशिष्ट्य बेताचेच असले तरी दांडगी हौस आणि संगीताची आवड येथील मराठीप्रेमी मंडळीत सतत टिकून रहावी ही इच्छा ह्या स्थानिक कलाकारांत प्रामुख्याने होती व त्याचे योग्य श्रेय त्यांना जरूर द्यावे लागेल. ‘गीतरामा-यण’ हा सुश्राव्य कार्यक्रम स्थानिक कलाकारांनी १९७७ मध्ये प्रथम सादर केला. सौ. शोभा आंबेगांवकर यांचे उत्तम संगीत, श्री. प्रमोद देशपांडे यांचे योग्य नि-वेदन आणि प्रेमळ श्रोतृवृंद असा सुरेख संगम ह्या कार्यक्रमात अनुभवण्यास मिळाला. त्याच उत्साहात पुढे जाऊन १९७८ मध्ये मराठीतील ‘संगीत वैभव’ हा नाविन्यपूर्ण कार्यक्रम मोठ्या अभिमानाने येथील कला-वंतांनी सादर केला. महाराष्ट्रातील काही निवडक संगी-तांची सांगड योग्य निवेदनाने घातली गेली व एक छोटासा वाद्यवृंदच साथीला तयार होऊन हा संगीताचा

आविष्कार झाला. 'घनश्यामसुंदरा' ह्या भुपाळीने सुरुवात होऊन 'अच्युता, अनंता - - ' ह्या भजनाने त्याची सांगता झाली. 'येऊं कशी तशी - - ' ही लावणी, 'वल्हव रे नाखवा - - ' हे कोळीगीत, 'कोल्हापूरची अंबाबाई - - ' हे लोकगीत अशा विविधप्रकारच्या संगीताने हा कार्यक्रम नटलेला होता. शिवरायाच्या राज्याभिषेकाचे वर्णन ऐकून सर्वांचा महाराष्ट्राभिमान दुणावला तर नाट्यसंगीताच्या आविष्काराने श्रोत्यांना काहीकाळ भावनाप्रधान करून सोडले.

नाट्य आणि संगीत ह्याचबरोबर साहित्य क्षेत्रांतहि आघाडी मारण्यास येथील मंडळींनी सुरुवात केली होती. 'रसगंधा' ही एक पाकक्रियांची पुस्तिका येथील मंडळाने प्रसिद्ध केली. पाककौशल्याचा प्रश्नच नाही परंतु ह्या पुस्तिकेची मांडणी, आखणी आणि पाकक्रिया लिखाणातील शैली साहित्याची चुणूक जरूर दर्शविते.

पहिला ६ ते ७ वर्षांचा काळ अशा रितीने उत्साहाने गेला. त्यानंतर मात्र मंडळाचे सभासदत्व ७५/८० वरून झपाट्याने वाढत गेले. सध्या 200 च्यावर ही संख्या आहे. नवीननवीन उत्साही मंडळी येथे आली. साहित्य, संगीत आणि नाट्य अशा तिन्ही क्षेत्रांत चालू केलेली छोटीशीच पण महत्वाची वाटचाल ह्या नवीन मंडळींच्या उत्साहाने जोरदार होण्यास सुरुवात झाली. नाट्यक्षेत्रांत एकांकीका पुन्हां जोर धरूं लागल्या. 'बिचारा डायरेक्टर' आणि 'श्यामभटाचा ऐरावत' ह्या एकांकीका उत्साहाने साजऱ्या झाल्या. ताबडतोब 'पपा सांगा कुणाचे' हे तीन अंकी नाटक येथील मंडळींनी बसवायला घेतले. तीन अंकी नाटकाचा प्रयत्न पूर्वी करताना आलेल्या अडचणींचा इतिहास विचारात घेऊन त्या यशस्वीरित्या बाजूला केल्या गेल्या व ह्या नाटकाचा प्रयोग अपेक्षेबाहेर यशस्वी झाला असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही. ह्या नाटकाचा प्रयोग नुसताच यशस्वी झाला असे नाहीं तर त्यापुढेही जाऊन असे म्हणावेसे वाटते की, दरवर्षी 'महाराष्ट्र मंडळ लॉस एंजेलीस' निदान एकतरी संपूर्ण नाटक करणार ह्याची ती मुहूर्तमेढच रोवली गेली आहे.

संगीताच्या क्षेत्रांत तर फारच मोठी प्रगती येथे होत आहे. डॉ. गोपाळ मराठे ह्यांच्यासारखे गुणवैशिष्ट्याचे कलाकार मंडळाच्या सद्भाग्याने लाभले आहेत. त्यांच्या उत्साहाने व मार्गदर्शनाने भारतीय व त्यातल्यात्यात महाराष्ट्रातील संगीताचा आविष्कार येथे सतत होत आहे. स्थानिक कलाकारांना उत्तेजन मिळावे म्हणून 'गुणदर्शन' हा उपक्रम येथे सुरू करण्यांत आलेला आहे. दर ८ ते १० आठवड्यांनी उत्साही मंडळी एकत्र जमतात व आपापल्या अंगातील कला मोठ्या उत्साहाने दर्शवितात. मग ते नाट्य असो, संगीत असो अथवा साहित्य असो. उत्तेजन, सभाधीटपणा आणि आत्मविश्वास ह्या तिन्ही गुणांचा विकास करणारी ही योजना फारच स्तुत्य आहे व असा हा उपक्रम सुरू करणारी व सातत्याने ते चालू ठेवणारी उत्साही मंडळी मंडळास लाभली हे भाग्यच नव्हे काय?

गुणदर्शनाबरोबर त्याचसारखे आणखी काही वाखाणण्यासारखे उपक्रम येथे सुरू आहेत. रविवारची 'मराठी शाळा' आणि 'महाराष्ट्र तरुण मंडळ' हे त्यापैकीच होत. येथील पुढील पिढीला मराठी भाषेचे ज्ञान व त्यायोगेच भारतीय संस्कृतीचे ज्ञान त्यांना देण्याची इच्छा येथील मंडळींच्या मनांत खूप



**वधू :** वय २१, उजळ, देखणी, गौड सारस्वत ब्राम्हण, न्युयॉर्कमध्ये लवकरच पदवी मिळवेल. एकुलती मुलगी, पालक सध्या युनोच्या कामगिरीवर आलेले असून लवकरच परतणार आहेत. जाण्यापूर्वी निवड करण्याची इच्छा.

**अपेक्षित वर :** अनुरुप, महाराष्ट्रीय तरुणानी संपर्क साधावा.

MR. V. S. PIKLE
140-11 APT. 5H
ASH AVE. FLUSHING,
NEW YORK,
Ny. 11355

दिवसांपासून होती. १९८१ च्या गुढीपाडव्याचा मुहूर्त साधून मराठीशाळा सुरु झाली. अंतरे लांब ही अडचण शाळेच्या दोन शाखा उघडून सोडवण्यात आली आहे. ह्या शाळेतील मुलांचा उत्साह इतका अवर्णनीय आहे की त्यांनी ४ महिन्यांतच दोन मराठी एकांकीका सादर केल्या – सई परांजपेलिखित 'जादूचा शंख' आणि पु.ल. देशपांडेलिखित 'वयम् मोठम् खोटम्.' १९८१ च्या गणेशोत्सवात ह्या एकांकिका सादर करण्यात आल्या. ज्यांना मराठीची फारशी ओळख ४ महिन्यांपूर्वी नव्हती त्यांनी मराठी नाटिका सादर करावी असे बालकलाकार आणि तसे त्यांच्याकडून करवून घेणारी त्यांची पालकमंडळी असे सर्वांचेच कौतुक करावे तेवढे थोडेच आहे. हे बालकलाकार लगेच 'पुढचे नाटक कधी करायचे' असे विचारू लागली ह्यांतच काय ते समजा!

धड लहान नाही व धड मोठे नाही असे अर्धवट वय १३ ते १९ आहे असे म्हटले तर वावगे नव्हे. 'महाराष्ट्र तरुण मंडळ' हे असेच समदुःखी समवयस्की मंडळींनी चालू केले आहे. नुकतेच सुरु झाले आहे व त्यामुळे अजून त्यांची ओळख सर्वांना पटलेली नाही. परंतु त्याचे उद्देश आपण पाहिले तर ह्या मंडळीची विचारशक्ति आपण खूपवेळा निरर्थक म्हणून संबोधतो ही चूक आपल्या लक्षांत येते. 'मंडळाच्या प्रत्येक कार्यक्रमास उपस्थित राहून पडेल ते काम व लागेल ती मदत करणे', 'मराठीभाषा शिकून भारतीय संस्कृतीचा अभ्यास करणे', 'शैक्षणिक व करमणुकीचे मेळावे भरवणे' ह्या तीनच उद्देशातून हे विधान पटण्यासारखे आहे.

अशा तऱ्हेने हे लॉ. एं. चे महाराष्ट्रमंडळ बाल्यावस्थेतून शैशवात आऊं पहात आहे. खूप वाटचाल करायची आहे - खूप मनसुबे रचावयाचे आहेत. 'मराठा तितुका मेळवावा, महाराष्ट्र धर्म वाढवावा' ह्या समर्थांच्या उक्तीचा सक्रिय अर्थ येथील मंडळास प्रतिपादन करावयाचा आहे. मराठी आणि भारतीय संस्कृतीचा वारसा सतत पुढे चालू रहावा ह्याकरता हे प्रयत्न फार महत्वाचे व उपयुक्त आहेत ह्यात संशयच नाही व अशा मंडळाचा एक सभासद ह्या नात्याने परमेश्वराजवळ ह्या मंडळास सतत यश लाभत राहो ही सर्वांतर्फे प्रार्थना करीत आहे.